► सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिज्ञाबध्द असलेले शासन मान्यताप्राप्त मराठी साप्ताहिक ►

साप्ताहिक (स्थापना : १९ जानेवारी २००८) शासकीय जाहिरात यादीवरील साप्ताहिक

# पहाटवारा


R.N.I. No. MAHMAR/2008/22960

वाशिम । खंड १९ । वर्ष २० । अंक १ । शनिवार दि. ३१ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ । पृष्ठे ४ । किंमत १ रुपया

**Website** :
pahatwara.page
pahatwara.com

**Postal Regd. No.**
Akola DN./045/2026-2028

**EMAIL ID**
adityanewsnetwork@gmail.com
weeklypahatwara@gmail.com
pahatwarawsm@gmail.com



श्रध्दास्थान मुनीश्री तरुणसागरजी महाराज



श्रध्दास्थान मुनीश्री विद्यासागरजी महाराज

संपादक : संदीप ओंकारआप्पा पिंपळकर Mob. 9822047068, 8275220012 ► सहसंपादक : रणजितसिंह ठाकुर 8483883416

## महत्वाचे

### बौद्ध समाजासाठी कार्यरत सामाजिक संस्थांना पायाभूत सुविधा योजनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

मुंबई, दि. २८ : राज्यातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्वस्त/सदस्यांची संख्या असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी रु.१० लाखापर्यंत अनुदान योजना राबविण्यात येत आहे. सन २०२५-२६ या वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणा-या मुंबई उपनगर जिल्ह्यातील संस्थांनी दि. २० फेब्रुवारी, २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावा.

अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या तसेच शासन परिपत्रक दि.२७.०१.२०२६ मधील तरतुदी विचारात घेऊन संस्थांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. संस्था राज्यातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे व नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. संस्थेच्या विश्वस्त/सदस्यांमध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्वस्त/सदस्य असणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत संस्थांनी यापूर्वी ज्या प्रयोजनार्थ अनुदान प्राप्त केले आहे. ते त्याच प्रयोजनार्थ उपयोगात आणले असल्याचे प्रमाणित करून त्याबाबतचे विहित नमुन्यातील संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्या प्रतिस्वक्षारीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल, असे मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना नूतनीकरणासाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई, दि. २९ : मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयात प्रवेशित अनुसूचित जमातीच्या ज्या विद्यार्थ्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना २०२५-२०२६ करीता अद्याप नूतनीकरणाचे अर्ज सादर केलेले नाहीत, अशा पात्र विद्यार्थ्यांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत स्वयंम योजनेच्या नूतनीकरणाचे अर्ज http:// swayam. mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मुंबई यांनी केले आहे.

विहित मुदतीत नूतनीकरणास पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कार्यालयास प्राप्त न झाल्यास, त्यांच्या जागी नविन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी. ज्या विद्यार्थ्यांची शासकीय वसतिगृहात गुणवत्ता यादीद्वारे निवड झालेली आहे व ज्यांना संबंधित वसतिगृहाकडून आवेदनपत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत, अशा विद्यार्थ्यांनी वसतिगृहातच प्रवेश घ्यावा. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेत हस्तांतरित करण्यात येणार नाहीत, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# परळी वैजनाथमध्ये १३ फेब्रुवारीपासून अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शन

## ■ १ हजाराहून अधिक पशूंचे प्रदर्शन; पशुसंवर्धन विभागामार्फत नियोजनास वेग

**मुंबई, दि. २७ : बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातीच्या एक हजाराहून अधिक पशू प्रदर्शन होणार असून प्रदर्शनाची तयारी वेगात सुरू आहे.**



या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळतील. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून पशुपालकांना पशुसंवर्धनाविषयीची संकीर्ण व अद्ययावत माहिती एकाच छताखाली उपलब्ध होईल. याचा फायदा पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी होईल, असा विश्वास पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी व्यक्त केला. नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शासकीय जमिनींच्या भाडेपट्टीचा कालावधी तीसहून अधिक वर्षे वाढविण्यास मान्यता

**मुंबई – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतुदी अन्वये शासकीय जमीन विविध कारणांसाठी ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येतात. त्यांचा कालावधी पुढे ४९ वर्षांपर्यंत वाढवण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.**

शासनाच्या विविध प्रशासकीय विभागाच्या मालकीच्या अथवा महसूल विभागाने विशिष्ट प्रयोजनासाठी त्या विभागाकडे हस्तांतरित केलेल्या तसेच त्यांच्या अख्यत्यारितील महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या मालकीच्या अथवा हस्तांतरित केलेल्या शासकीय जमिनी महामंडळ, मंडळ, प्राधिकरणे यांच्या उत्पन्न वाढीसाठी विविध व्यावसायिक प्रयोजनास्तव विविध संस्थांना ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्यांवर दिल्या जात होत्या.

अशा जमिनी आता आवश्यकतेनुसार प्रथमतः जास्तीत जास्त ४९ वर्षापर्यंत व त्यानंतर कोणत्याही अटी व शर्तींचे उल्लंघन झालेले नसल्यास, संबंधित विभागाला आवश्यकतेनुसार या भाडेपट्ट्याचे पुन्हा एकवेळ जास्तीत जास्त ४९ वर्षांच्या मर्यादेत नुतनीकरण करुन, योग्य तो भाडेपट्टा आकारुन जमीन भाडेपट्ट्याने देता येतील. तसेच, सध्या भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींचे संभाव्य नूतनीकरण, भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींच्या भुईभाड्यामध्ये ठराविक निश्चित मुदतीत वाढ तसेच भुईभाड्याची रक्कम भाडेपट्टाधारकाकडून नियमितपणे शासन जमा करण्यात येईल व त्यावर योग्यप्रकारे संनियंत्रण संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांकडून ठेवण्यात येणार आहे.

# महाराष्ट्राची तनु भान देशातील 'सर्वोत्कृष्ट कॅडेट'

## ■ प्रधानमंत्री मोदींच्या हस्ते सुवर्ण पदकाने सन्मानित

**नवी दिल्ली,२९ :प्रजासत्ताक दिनाच्या परेडनंतर राजधानी दिल्लीतील करिअप्पा मैदानावर पार पडलेल्या एनसीसी रॅलीमध्ये महाराष्ट्राच्या कन्येने आपल्या अद्वितीय कर्तृत्वाचा झेंडा फडकवला आहे. महाराष्ट्र संचालनालयाची ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिने आर्मी विंगमधून (सीनियर विंग) देशातील 'सर्वोत्कृष्ट कॅडेट' हा सर्वोच्च बहुमान प्राप्त केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिमाखदार सोहळ्यात तनु भान हिला सुवर्ण पदक आणि मानाची 'केन' देऊन गौरविण्यात आले.**



यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि एनसीसीचे महासंचालक लेफ्टिनेंट जनरल वीरेंद्र वत्स यांची विशेष उपस्थिती होती. देशभरातील १७ संचालनालयांमधील २० लाख कॅडेट्सच्या स्पर्धेत, तनुने आपल्या अद्वितीय शिस्तीच्या आणि अष्टपैलू कौशल्याच्या जोरावर हे ऐतिहासिक यश खेचून आणले. 'राष्ट्र प्रथम - कर्तव्यनिष्ठ युवा' या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत, तिने प्रशिक्षणातील सर्व कठीण टप्पे यशस्वीपणे पार करत देशात प्रथम क्रमांक पटकावला.

या प्रसंगी कॅडेट्सना संबोधित करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणांच्या राष्ट्रभक्तीचा गौरव केला. प्रधानमंत्री म्हणाले की, समोर असलेले हे तरुण केवळ गणवेशातील कॅडेट्स नसून, ते 'विकसित भारत'चे निर्माते आहेत. तुमचे परिश्रम, त्याग आणि अनुशासन हेच देशाला प्रगतीपथावर नेणारे मुख्य आधारस्तंभ आहेत. 'राष्ट्र प्रथम - कर्तव्यनिष्ठ युवा' या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी तनु भान आणि इतर विजेत्यांचे विशेष कौतुक केले. ही वचनबद्धता देशाला उज्ज्वल भविष्याकडे नेईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सुविचार : जो आपण न मागता प्राप्त करतो, प्रेमाने मिळवतो आणि समोरच्याला अतिशय सन्मानाने देतो, तोच आदर होय. - फिलिप जेम्स बेली

# जेवणात खावी भाकरीच..?



ज्वारीमध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने शरीरास पटकन ऊर्जा मिळते. कमी खाऊनही पोट भरल्याची जाणीव होते. ज्वारीमध्ये असणाऱ्या अमिनो ॲसिड्समधून शरीरास मुबलक प्रोटीन्स मिळतात. तसेच फायबर्स असल्याने सहज पचन होते. बद्धकोष्ठतेचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाण्याची सवय लावून घ्यावी. त्यामुळे मूळव्याधाचा त्रास होत नाही. तसेच ज्यांना किडनी स्टोनचा त्रास टाळायचा असेल त्यांनी नक्कीच ज्वारीची भाकरी आहारात आणावी. ज्वारीतील पोषणतत्त्वामुळे किडनी स्टोनला दूर ठेवता येते. ज्वारीमध्ये असणाऱ्या निॲसिनमुळे रक्तातील कॉलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. तसेच ज्वारीमधील फायटो केमिकल्समुळे हृद्रोग टाळता येतात. ज्वारीमधल्या पोटॅशिअम, मॅग्नेशिअम आणि मिनरल्समुळे ब्लडप्रेशर नियंत्रणात राहते. भाकरीत लोह मोठ्या प्रमाणात असते. ॲनिमियाचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाल्ल्यास त्यांना फायदा होतो. लाल पेशींची वाढ होण्यास मदत होते.

ज्वारीच्या पिठाची भाकर, थालीपीठ, धपाटे, उपमा, खानदेशात कळण्याच्या (ज्वारी व उडीद एकत्र दळून केलेले पीठ) पिठाची भाकरी, ज्वारीचे पापड, बिबडे, पाने, लाह्या, लाह्यांच्या जाडसर पिठाचे गोड पदार्थ, ज्वारी पीठ आंबवून केलेले धिरडे असे अनेक पारंपरिक पदार्थ आवर्जून आवडीने तयार केले जातात. ज्वारीपासून रवा, लाह्या, पीठ, मिश्रधान्य पीठ, कळणा पीठ, हुरडा, पोहे, पास्ता, पापड, केक, बिस्कीट, कुकीज, ब्रेड, बन, बाल आहार, सिरप व साखर ( गोड ज्वारीपासून ) भरडा, मोड आणून बनविलेले पीठ (माल्ट फ्लोअर) हे पदार्थ तयार करता येतात. ज्वारीमधील पोषकद्रव्ये पाहता ज्वारीचा आहारात उपयोग केल्यास आहारातील पोषक मूल्यांचे संतुलन योग्य ठेवण्यास मदत होते.

ज्वारीचे पीठ, रवा, शेवया, पास्ता, बेकरीचे पदार्थ, पोहे, लाह्या तयार करण्याचे तंत्र कृषी विद्यापीठ, अन्न तंत्र विभाग, प्रक्रिया विभाग, संशोधन केंद्रांनी विकसित केले आहे. भाकरी करणे हा महाराष्ट्र, कर्नाटक आणि इतर काही राज्यातील अनेक स्त्रियांच्या हातचा मळ आहे. सांज-सकाळ भाकऱ्या थापून त्यांच्या हाताला इतकी सवय झालेली असते, कि हातासरशी त्या भाकऱ्यांबरोबर, इतर दोन-चार प्रकार ही करुन टाकतात. पण तरी ते तंत्र सोपे नाही. नवीन शिकणाऱ्या व्यक्तीस, ते जमणे जरा कठिणच आहे. तरी ते काम सोपे पण नाहीच.

आपल्याकडे भाकरीसाठी ज्वारी, बाजरी, मका, पटणी, नाचणी, तांदूळ अशी धान्ये वापरली जातात. या सर्व धान्यात ग्लुटेन अगदीच कमी असल्याने, या पिठाला चिकटपणा असा नसतोच, त्यामुळे उकड काढली तरच या भाकऱ्या लाटता येतात, नाहीतर त्या थापूनच कराव्या लागतात. त्यापुर्वी पिठ चांगले मळून घ्यावे लागते, तसेच तव्यावरच्या भाकरीवर नेमक्या वेळी आणि नेमकेच पाणी, फिरवावे लागते. त्यात अजिबात चूक होऊन चालत नाही.

# घनकचरा विलिनीकरण प्रक्रिया केंद्राचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते उद्घाटन

**वाशिम, दि. २६ जानेवारी (जिमाका) शहर स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत वाशिम येथे घनकचरा विलिनीकरण प्रक्रिया केंद्राचे उद्घाटन आज दि.(२६) रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. 'फ्री ऑफ कॉस्ट ' तत्वावर चालविला जाणारा हा विलगीकरणाचा प्रथम प्रकल्प आहे.**

यावेळी नगरपालिका मुख्याधिकारी निलेश गायकवाड, नगरपालिका प्रशासनातील अधिकारी, लोकप्रतिनिधी, स्वच्छता कर्मचारी व नागरिक मोठ्या उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री ना. भरणे यांनी केंद्राची पाहणी करून कार्यपद्धतीची राम डोरले यांच्याकडून माहिती जाणून घेतली. पालकमंत्री म्हणाले की, घनकचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण, प्रक्रिया व पुनर्वापर केल्यास पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी करता येतो. हे केंद्र म्हणजे स्वच्छ भारत अभियानाला बळकटी



देणारे महत्त्वाचे पाऊल असून, शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने होणार आहे. या केंद्रामार्फत ओला व सुका कचरा वेगळा करून त्यावर प्रक्रिया करण्यात येणार असून सेंद्रिय कचऱ्यापासून खतनिर्मिती, तर पुनर्वापरयोग्य कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होऊन स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

जिजा ॲग्रिकल्चर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडचे संचालक राम डोरले यांनी केंद्राच्या उभारणीबाबत माहिती देताना सांगितले की, स्वच्छता व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून भविष्यात नागरिकांच्या सहकार्याने हे केंद्र आदर्श ठरेल.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नागरिकांनीही स्वच्छता राखण्याची व कचरा वेगळा करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले. घनकचरा विलगीकरण केंद्रातील काम करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांशी पालकमंत्र्यांनी यावेळी संवाद साधला.

# राष्ट्रीय मतदार दिनाच्या अनुषंगाने लोकशाहीवरील निष्ठेची शपथ




वाशिम दि.२४ जानेवारी (जिमाका) लोकशाही बळकट करण्याचा संदेश देत जिल्हा प्रशासनाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनाच्या औचित्याने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदानाच्या हक्काबाबत जागरूक राहण्याची व लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याची शपथ घेतली. या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी धनाजी तोरस्कर, उपजिल्हाधिकारी नागटिळक, सहाय्यक अधीक्षक सुनील घोडे, नायब तहसीलदार सदाशिव पढवे, सहाय्यक महसूल अधिकारी रवि महाले तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने नागरिकांनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, मतदानाचा हक्क बजावावा आणि संविधानिक मूल्यांची जपणूक करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# मराठा कुणबी जात प्रमाणपत्रांसाठी प्राप्त अर्ज प्रलंबित राहू नयेत

## ■ जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील ■ मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्देश ■

**मुंबई, दि. २७ : मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने हैदराबाद गॅझेटिअरच्या संदर्भात सप्टेंबर २०२५ मध्ये जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानंतर मराठवाडा महसूल विभागातील आठही जिल्ह्यांत प्रमाणपत्रांसाठी अर्ज प्राप्त होत असून, हे अर्ज प्रलंबित राहू नयेत यासाठी कार्यवाहीस गती देण्यात यावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. गावपातळीपर्यंत जाऊन शासकीय यंत्रणेने सक्रियपणे प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.**

मंत्रालयात जलसंपदा मंत्री तथा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण उपसमितीच्या झालेल्या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, माजी न्यायमूर्ती संभाजी शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव गणेश पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, उपसमितीचे सदस्य, विविध विभागांचे सचिव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

यावेळी जलसंपदा मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, उपसमिती तसेच माजी न्यायमूर्ती संभाजी शिंदे यांनी दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जात दाखले व वैधता प्रमाणपत्र वितरणातील अडथळे दूर करावेत. मराठा कुणबी जात दाखले व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने स्पष्ट आदेश दिले असून, हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी, जिल्हा प्रशासनामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीचा नियमित आढावा विभागीय आयुक्तांनी घ्यावा,असेही त्यांनी सांगितले.

दाखले वितरणाचा वेग वाढविण्यासाठी माजी न्यायमूर्ती शिंदे यांनी दिलेली महत्त्वपूर्ण माहिती उपयुक्त ठरणार असून, ते मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांना भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत. सप्टेंबर २०२५ नंतर प्राप्त अर्ज व वितरित दाखल्यांचे प्रमाण सध्या कमी असून, ते वाढविण्याची आवश्यकता असल्याचे मंत्री विखे-पाटील यांनी सूचित केले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले की, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध शैक्षणिक लाभ दिले जात आहेत. शिष्यवृत्ती तसेच शैक्षणिक व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती आदींसाठी ओबीसी विभाग, वैद्यकीय शिक्षण व कृषी विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करण्यात यावी.

या दृष्टीने बैठकीचे आयोजन करावे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मराठा कुणबी उमेदवारांच्या जात प्रमाणपत्र अर्जांवर तातडीने कार्यवाही करताना प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीत सचिव गणेश पाटील तसेच विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी जात प्रमाणपत्र वितरणाची सद्यस्थिती सादर केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रहिवासी पुरावे, वंशावळ व १९६७ पूर्वीच्या पुराव्यांच्या आधारे करण्यात येत असलेल्या नियमानुसार कार्यवाहीची माहिती दिली.

पहाटवारा (मराठी साप्ताहिक ) ● RNI No. MAHMAR/2008/22960
● मुद्रक - मनोहर प्रभुदास मोहोड ● प्रकाशक - संदीप ओंकारआप्पा पिंपळकर ● मालक - संदीप ओंकारआप्पा पिंपळकर ● मुद्रण स्थळ - श्री महाविर प्रिंटर्स जुने अकोट मोटर स्टॅन्ड, माणेक टॉकीजच्या मागे, अकोला ता. जि. अकोला ४४४००५ (महाराष्ट्र) ● प्रकाशन स्थळ - कार्यालय साप्ताहिक पहाटवारा, व्दारा आदित्य कॉम्प्युटर, विठ्ठलवाडी जवळ, वाशीम जि.वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) ● संपादक - संदीप ओंकारआप्पा पिंपळकर (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# २६९६ कोटी रुपयांच्या तूर खरेदीला केंद्राची मंजुरी

**नवी दिल्ली,२५ : महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यातील ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मंजुरी दिली आहे.**

नवी दिल्ली येथे पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे 'किंमत समर्थन योजने'अंतर्गत (झडड) सुमारे २,६९६ कोटी रुपयांच्या निधीतून ही तूर खरेदी केली जाणार असून, याचा थेट लाभ राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मिळणार आहे. या बैठकीस महाराष्ट्राचे पणन मंत्री जयकुमार रावल आणि केंद्रीय कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे. तूर खरेदीच्या या निर्णयामुळे केंद्रावर मोठा आर्थिक भार

### महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

पडणार असला, तरी शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळणे ही सरकारची प्राथमिकता आहे. ही खरेदी प्रक्रिया नेफेड (छअऋए) आणि एनसीसीएफ (छउउऋ) या संस्थांच्या माध्यमातून राज्य शासनाच्या समन्वयाने राबवली जाईल, असे मंत्री चौहान यांनी स्पष्ट केले.

खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचनाही मंत्र्यांनी यावेळी दिल्या. शेतकऱ्यांची नोंदणी करताना कोणतीही अडचण येऊ नये आणि बिचौलियांचा हस्तक्षेप पूर्णपणे थांबवावा, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच, शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. या प्रक्रियेमुळे थेट शेतकऱ्यांकडून खरेदी केली जाणार असून, व्यापाऱ्यांऐवजी मूळ उत्पादकांपर्यंत सरकारचा पैसा पोहोचणार आहे.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**पुणे, दि. २९ (जिमाका वृत्तसेवा) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.**



यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रताप जाधव, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आंध्र प्रदेशचे शिक्षण मंत्री नारा लोकेश, खासदार निरज चंद्रशेखर, वन मंत्री गणेश नाईक, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक वुईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ तसेच नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, कामगार मंत्री आकाश फुंडकर उपस्थित होते.

प्रशासनाच्या वतीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्यभरातील खासदार, आमदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह सर्वसामान्य नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

अंत्यसंस्कारापूर्वी दिवंगत अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी विद्या प्रतिष्ठान परिसरात पहाटेपासूनच जनसागर उसळला होता. सामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी यांनी उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

### ■ महिला मतदारांचा कौल ठरणार निर्णायक; सकाळी ८ ते सायंकाळी ५ पर्यंत मतदान ■

# ब्रम्हा येथे दारूबंदीबाबत ९ फेब्रुवारी रोजी मतदान

**वाशिम, दि.३० जानेवारी (जिमाका) वाशिम तालुक्यातील मौजे ब्रम्हा, येथे असलेल्या ऋषी रेस्टॉरंट ॲण्ड बाईन बार यांची मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करावी अथवा नाही, याबाबत दारूबंदी निवडणूक घेण्यात येणार असून, ही निवडणूक दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे.**

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिलेल्या आदेशान्वये सदर मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी वाशिम तहसिलदार निलेश पळसकर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच तहसिलदार, वाशिम यांचे आदेश क्रमांक जा.क्र. म.स./सा.नि./कावि/२४/२०२६, दिनांक २३ जानेवारी २०२६ अन्वये नायब तहसिलदार, ही.एस.आडे यांना निवडणूक प्रक्रियेची जबाबदारी देण्यात आली आहे.

मतदान केंद्रांचा तपशील - ३४ ह वाशिम (अ.जा.) विधानसभा मतदार संघातील मतदार यादी भाग क्र. ३३० व मतदान केंद्र क्र. १ मधील मतदारांसाठी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, ब्रम्हा, खोली क्र. १ (पूर्वेकडील भाग) मतदार यादी भाग क्र. ३३१ व मतदान केंद्र क्र. २ मधील मतदारांसाठी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, ब्रम्हा, खोली क्र. २ (पूर्वेकडील भाग) मतदान व मतमोजणी - मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. मतमोजणी दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ब्रम्हा येथे होणार असून, निकाल तात्काळ जाहीर करण्यात येणार आहे. महिला मतदारांचा अधिकार - शासन राजपत्रातील तरतुदीनुसार, दि. २९ ऑक्टोबर २०२४ रोजी अस्तित्वात असलेल्या मतदार यादीतील (भाग क्र. ३३० ते ३३१) नाव समाविष्ट असलेल्या महिला मतदारांनाच या मतदानात सहभागी होता येणार आहे. सदर यादीतील एकूण महिला मतदारांच्या किमान ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतदारांनी मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास, ग्रामपंचायत ब्रम्हा हद्दीतील मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यामार्फत देण्यात येणार आहेत. सदर मतदानासाठी वापरण्यात येणारी मतपत्रिका शासन राजपत्रातील परिच्छेद ९ मध्ये नमूद नमुन्यानुसार असणार आहे.असे निवडणूक नायब तहसिलदार तथा प्राधिकृत अधिकारी सी.एस.आडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी केली टेम्पल गार्डनची पाहणी

**वाशिम, दि. २० जानेवारी (जिमाका) वाशिम शहरातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या टेम्पल गार्डनची पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी पाहणी करून प्रस्तावित विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी उद्यानातील विविध सुविधांची माहिती घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.**



यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, नगरपालिका सह आयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपनगराध्यक्ष राजू भांदुर्गे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पाहणीदरम्यान उद्यानातील स्वच्छता, हिरवळ, चालण्याचे मार्ग, प्रकाशव्यवस्था तसेच नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या इतर सोयी-सुविधांबाबत पालकमंत्र्यांनी सूचना दिल्या. टेम्पल गार्डन हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे आणि नागरिकांसाठी विरंगुळ्याचे महत्त्वाचे ठिकाण असल्याने येथे दर्जेदार व टिकाऊ विकासकामे होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी शासनामार्फत टेम्पल गार्डनच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून देण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल, असे स्पष्ट केले. तसेच जनतेच्या सेवेसाठी टेम्पल गार्डनचे दालन लवकरात लवकर खुले करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. नगरविकास विभागाकडे आवश्यक तो पाठपुरावा निश्चितच केला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या पाहणीमुळे टेम्पल गार्डनच्या विकासाला गती मिळून लवकरच नागरिकांना आधुनिक व सुसज्ज उद्यानाचा लाभ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# देशातील पहिल्या रजोनिवृत्ती क्लिनिक्सची महाराष्ट्रात सुरुवात

■ आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर ■ महिलांच्या आरोग्य सेवेत राष्ट्रीय आदर्श

**मुंबई, दि. २७ : महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणाऱ्या दूरदर्शी उपक्रमांतर्गत महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. राज्यात शासकीय रुग्णालये व शहरी आरोग्य केंद्रांमध्ये विशेष रजोनिवृत्ती क्लिनिक्स सुरू करण्यात आली आहेत. सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला राज्यभरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**



रजोनिवृत्ती हा स्त्रीच्या आयुष्यातील नैसर्गिक व संवेदनशील टप्पा असून, या काळात शारीरिक, भावनिक व हार्मोनल बदल मोठ्या प्रमाणावर जाणवतात. हार्मोनल असंतुलन, हाडांचे विकार, झोपेच्या तक्रारी, हृदयविकाराचा धोका तसेच मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या यांसारख्या बाबींकडे सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेत विशेष लक्ष देवून शासनाने रजोनिवृत्ती-केंद्रित आरोग्य सेवांना संस्थात्मक स्वरूप देत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

या रजोनिवृत्ती क्लिनिक्समध्ये महिलांसाठी एकाच छताखाली सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात येत असून, त्यामध्ये तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन, हार्मोनल, हाडे व हृदयाच्या आरोग्याची तपासणी, आवश्यक उपचार, औषधे तसेच जीवनशैलीविषयक मार्गदर्शन यांचा समावेश आहे.

या सेवांचा लाभ घेतलेल्या महिलांनी समाधान व कृतज्ञता व्यक्त केली असून, हा उपक्रम आवश्यक, सन्मानजनक आणि महिलांना सक्षम करणारा असल्याची भावना व्यक्त केली आहे. विशेष बाब म्हणजे, राज्यव्यापी व संघटित स्वरूपात रजोनिवृत्ती काळजी कार्यक्रम सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले असून, त्यामुळे इतर राज्यांसाठी हा एक राष्ट्रीय आदर्श निर्माण झाला आहे. मकर संक्रांतीच्या दरम्यान या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली असून, महिलांसाठी ही एक अर्थपूर्ण व आरोग्यकेंद्रित भेट ठरली आहे. राज्याच्या विविध भागांतील महिलांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून, महिलांच्या आरोग्यविषयक प्रश्नांबाबत शासनाची संवेदनशीलता व सर्वसमावेशक सार्वजनिक आरोग्यसेवेप्रती असलेली बांधिलकी याचे हे उत्तम उदाहरण आहे.

रजोनिवृत्ती हा आजार नसून स्त्रीच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक महिलेला या टप्प्यात सन्मानपूर्वक, योग्य वैद्यकीय मार्गदर्शन व उपचार मिळावेत, यासाठीच रजोनिवृत्ती क्लिनिक्स सुरू करण्यात आली आहेत. महिलांचे आरोग्य सक्षम झाले, तर कुटुंब, समाज आणि राज्य अधिक सक्षम होईल. असे राज्यमंत्री मेघना बोर्डिकर यांनी सांगितले. हा उपक्रम सार्वजनिक आरोग्याबाबतच्या ठोस दृष्टीकोनाचे प्रतिबिंब असून, भारतात महिला-केंद्रित आरोग्यसेवेच्या दिशेने परिवर्तनकारी पाऊल म्हणून त्याचे व्यापक कौतुक होत आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देयकांसाठी ट्रेड प्लॅटफॉर्म

■ कंत्राटदारांसाठी सुविधा, पारदर्शकता, सूसुत्रता वाढणार

मुंबई - सार्वजनिक बांधकाम विभागामधील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक, कंत्राटदारांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी ट्रेडस् प्लॅटफॉर्मचा (टीआरईडीएस प्लॅटफॉर्म) अवलंब करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यातील सर्वच विभागांनी ट्रेडस् प्लॅटफॉर्म चा अवलंब करावा. प्रत्येक विभागाने आपल्या विभागाच्या कार्यपध्दतीशी आणि कामकाजाच्या आवश्यकतेनुसार आदर्श कार्य प्रणाली निश्चित (एसओपी) करावी. त्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

ट्रेड रिसिव्हेबल इलेक्ट्रॉनिक डिस्काऊंटींग सिस्टीम भारत सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचा संयुक्त उपक्रम आहे. वित्तीय समावेशन, मेक इन इंडिया, स्किल इंडिया आदी कार्यक्रमांना चालना देणे. सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना स्वस्त आणि वेळेत वित्तपुरवठा उपलब्ध करून देणे आहे.

या प्रणालीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील देयक प्रक्रियेत सुसूत्रता व पारदर्शकता येण्यास मदत होईल. प्रणालीमुळे विभागाकडे नोंदणी असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक कंत्राटदारांना आवश्यक खेळत्या भांडवलाची सुलभता मिळेल. त्यामुळे त्यांना कामकाजाचा विस्तार, तंत्रज्ञान अद्ययावत करणे आणि स्पर्धात्मकता वाढवणे शक्य होईल. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक कंत्राटदारांना खेळत्या भांडवलाच्या समस्यांवर मात करण्यासाठी आणि करारांची वेळेवर पूर्तता करण्यास मदत होईल. या प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणी नंतर पुढील टप्प्यात ई-टेंडरिंग, ई-प्रोक्युरमेंट पोर्टलला ट्रेड प्लॅटफॉर्मशी जोडणार. यामुळे एकाच ठिकाणी इनव्हॉईस सबमिशन, पडताळणी आणि डिस्काउटिंग शक्य होणार आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी ५ ऐवजी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान : ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी

**मुंबई, दि. २९ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.**



राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६ च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

## महत्वाचे

### शत्रू मालमत्तेच्या खरेदी-विक्रीवरील मुद्रांक शुल्क माफ करणार

**मुंबई - शत्रू मालमत्तेच्या खरेदी-विक्रीवरील मुद्रांक शुल्क प्रथम नोंदणी करताना माफ करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.**

केंद्र सरकारच्या गृह विभागाच्या नियंत्रणाखालील शत्रू संपत्तीच्या विश्वस्ताव्दारे-सेपी ( कस्टोडियन ऑफ एनिमि प्रॉपर्टी ऑफ इंडिया) शत्रू मालमत्तांचे जतन, व्यवस्थापन आणि विक्री केली जाते. शत्रू मालमत्ता कायदा, १९६८ अनुसार शत्रू संपत्तीचे विश्वस्त संपत्तीचे विक्री करू शकतात. राज्यात एकूण ४२८ शत्रू मालमत्ता आहेत. त्यापुढीलप्रमाणे ह छत्रपती संभाजी नगर-२, जालना -२, मुंबई-६२, मुंबई उपनगर-१७७, नागपूर-६, पालघर-७७, पुणे-४, रत्नागिरी -११, सिंधुदुर्ग-१, ठाणे-८६.

युद्धकाळात भारत सोडून शत्रू देशात स्थलांतरित झालेल्या नागरिकांच्या या मालमत्ता आहेत. सेपीकडून अशा प्रकारच्या मालमत्तांची विक्री करण्यासाठी लिलाव करण्यात येतो. मात्र या लिलावांस कमी प्रतिसाद मिळतो. सेपीव्दारे विक्री प्रमाणपत्र जारी केल्यानंतर मालमत्तेच्या पहिल्या नोंदणीवेळी मुद्रांक शुल्क माफ केल्यास शत्रू मालमत्ता खरेदीचा खर्च कमी होऊन खरेदीस प्रतिसाद मिळेल. त्यामुळे अशा मालमत्तांच्या खरेदी-विक्रीवरील मुद्रांक शुल्कात माफी द्यावी, असा प्रस्ताव सेपीकडून महसूल विभागास सादर करण्यात आला होता. त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत शत्रू मालमत्तेच्या खरेदी-विक्रीवरील मुद्रांक शुल्कात प्रथम नोंदणी करताना माफी देण्यास मान्यता देण्यात आली.

### शबरी महामंडळातर्फे कर्ज योजनेसाठी ऑनलाइन अर्ज आमंत्रित

वाशिम, दि. ३० जानेवारी (जिमाका) : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातर्फे कर्ज योजनेसाठी ऑनलाइन अर्ज आमंत्रित आहेत. वाशिम जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ९ योजनांतर्गत कर्ज उपलब्ध आहे. महिला सबलीकरण योजनेसाठी २ लाख रुपये, कृषी आणि संलग्न व्यवसायासाठी ५ लाख रुपये, हॉटेल ढाबा व्यवसायासाठी ५ लाख रुपये, ऑटो वर्कशॉप, स्पेअर पार्टसाठी ५ लाख रुपये, वाहन व्यवसायासाठी १० लाख व १०-१५ लाख रुपये, लघु उद्योग व्यवसायासाठी ३ लाख रुपये, ऑटो रिक्षा, मालवाहू रिक्षासाठी ३ लाख रुपये, स्वयम साहयता बचत गटासाठी ५ लाख रुपये इत्यादी योजना राबविण्यात येत आहे. तरी या योजनेकरीता लाभार्थ्यांनी www.mahashabari.in या वेबसाईड वर दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यात यावे. तसेच काही अडचण असल्यास कार्यालयाच्या ९४२२९४५५१० किंवा ०७२३२-२५३१६९ या नंबरवर संपर्क साधावा असे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातर्फे आवाहन करण्यात आले आहे.